**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**श्री डी.एस. राऊत यांनी कुलसचिव पदाचा पदभार स्वीकारला**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्या विभागाचे उपकुलसचिव श्री दिनकर स. राऊत यांना आजपासून सहा महिने किंवा नियमित कुलसचिवांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता कुलसचिव म्हणून स्थानापन्न नियुक्त करण्यात आले आहे. श्री दिनकर राऊत यांनी आज कुलसचिव पदाचा पदभार प्रभारी कुलसचिव तथा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांचेकडून स्वीकारला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी पुस्तक देवून त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड, श्री मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, सहा. कुलसचिव श्री संजय ऐरंडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधीक्षक श्री अरुण जोशी, स्वीय सहाय्यक श्री गजानन पंचवटे आदी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २५/०४/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी